**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| THE NAVHIND TIMES | 04-06-2018 | ENGLISH | PANAJI | DAILY |

# 2.66 crore poor and minority students availed scholarships, schemes: Naqvi

NT NETWORK

**PANAJI**

Union Minister for Minority Affairs Mukhtar Abbas Naqvi on Sunday said that in the last four years some 2.66 crore students belonging to minority and marginalised communities have benefitted from various scholarships and schemes.

Addressing a press conference in the city in the light of the fourth anniversary of the Modi government, Naqvi said the Haj subsidy has been withdrawn and the money siphoned from the subsidy is being utilised for empowerment of the youth from minority communities through employment-oriented skill development.

He said that more than 5,43,000 youngsters have been provided employment and more jobs have been created through skill development schemes.



Scholarships have also been provided and over 1.21 crore girls and women of the country have availed the schemes.

For the first time after the Independence of the country, a record number of 1,75,025 Indian Muslims have been going on Haj pilgrimage this year without availing any subsidy, he said adding that more than 1300 women pilgrims are going on the pilgrimage without male relatives.

Muslim women coordinators and assistants have been deputed to Saudi Arabia for facilitating the Haj 2018 for the first time.

The Centre has for the first time allowed women pilgrims over the age of 45 to undertake the pilgrimage in groups of at least four sans 'Mehram'.

Speaking on the achievements made by the Modi government in the last four years, the Union minister claimed that more than 1 crore households have renounced the gas subsidy under the 'Give it Up' campaign.

Moreover, free gas connections have been provided to more than four crore poor people under the central Ujjwal Yojana.

Red beacon light on VIP vehicles have been removed putting an end to the 'culture' associated with it, he said adding the Modi government has even withdrawn concessions at the Parliament canteen.

Naqvi observed that there would be no vacancy for the post of Prime Minister in 2019 as Modi will get absolute majority in Lok Sabha elections.

Development will be the plank for parliamentary polls, he said.

Conflict, contradiction and corruption have been the only joint agenda of the political parties which have been rallying against Modi, he said adding that the Congress and its allies that have been playing politics exploiting religions, regions and castes can't stomach the work done by the Prime Minister.

Replying to a question, he admitted that the outcome of the recent bypolls could have some impact on the prospects of the party, which has seen decrease in vote share due to the "unholy alliance" of some parties.

"The recent poll out-

>continued on Pg 10

## BJP knows seriousness of mining crisis: Naqvi

NT NETWORK

**PANAJI**

Stating that the BJP governments in the state and at the Centre have acknowledged the seriousness of the mining crisis in Goa, Union Minister for Minority Affairs Mukhtar Abbas Naqvi on Sunday said that since the matter is in the Supreme Court, the central government cannot do anything for now.

Replying to question on the beleaguered mining industry in the state at a press conference in the city, Naqvi said the BJP understands seriousness of the mining closure in Goa.

Refusing to elaborate on the matter, he said, "Our local leaders are following up the matter with the Centre, and we will work out a solution to the crisis."

# 2.66 crore poor and minority...

>continued from Pg 1

come has given us some experience, which will be factored in while formulating strategies for the 2019 Lok Sabha elections," he said

Simultaneous elections can be held provided there is consensus among political parties and the people. Elections to Lok Sabha and state assemblies can be held simultaneously keeping in mind expenditure and democracy.

Political parties have been asked to think over it, he said.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| GOMANTAK TIMES | 04-06-2018 | ENGLISH | PANAJI | DAILY |

# 'No vacancy for PM's post in 2019'

## MINORITIES IN OUR COUNTRY ARE SAFE, SAYS NAQVI

BY A STAFF REPORTER
reporters@gomantaktimes.com

**Panaji:** Union Minister for Minority Affairs Mukhtar Abbas Naqvi on Sunday said that minorities in India are safe.

Addressing a press conference in Panaji on the occasion of completion of four years of Prime Minister Narendra Modi led Central government, Naqvi said, "Minorities in our country are safe and the rights of the minorities including social, educational, religious and economic are more secure compared to any other democratic country in the world." Stating that there is no vacancy for the post of Prime Minister in 2019, Naqvi exuded confidence that Narendra Modi will get absolute mandate in the upcoming Lok Sabha polls.

Naqvi said, "There is no vacancy for Prime Minister's post in 2019. Modi will get absolute mandate for the developmental works carried out by him for the welfare of the people. Conflict, contradiction and corruption is the only common commitment of anti-Modi alliance."

Stating that Congress and its allies have been addicted to politics in the name of religion, region, caste and creed, Naqvi said, "They are now unable to digest atmosphere of trust and development created by Modi. The agenda of the BJP-led Central government is to eradicate poverty and end corruption while ushering in development. Some political parties have cut off from the ground reality by blaming Modi. There is a competition going on between those who work and those who are engaged in bashing and blaming."



**Union Minister for Minority Affairs Mukhtar Abbas Naqvi (C) speaks at a press conference in Panaji on Sunday. Rajya Sabha MP and BJP State president Vinay Tendulkar (L) is also present.** *Pic: Sandeep Desai*

Naqvi said that the Modi government has ensured honest and transparent system which is free from middlemen.

"Digital transaction in scholarship-subsidy transfer has ensured transparency while removing middlemen. Today a total of 431 schemes are concerned under the Direct Benefit Transfer (DBT). The government has also initiated electoral reforms and ensured transparent funding of political parties", he said.

Additionally, under Mudra Yojana, more than Rs 13 crore guarantee-free loans have been provided.

"More than 65 per cent beneficiaries are women, SC, ST and minorities. 19,000 villages have been provided with power connectivity and nearly 1 crore houses have been constructed under Pradhanmantri Awaas Yojana", said Naqvi.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| GOAN VAARTA | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

## केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांचा दाव

# मोदी सरकारकडून देशातील अल्पसंख्याकांचा सर्वंकष विकास

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**पणजी** : अल्पसंख्याकांचा केवळ मतांसाठी वापर करण्याचे राजकारण मागील सरकारांनी केले. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने अल्पसंख्याकांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्याचे चांगले परिणामही दिसू लागले आहेत, असा दावा केंद्रीय अल्पसंख्याकमंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी केला.

रविवारी पणजीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकारच्या चार वर्षांच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी नक्वी सध्या गोवा दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांच्यासमवेत राज्यसभा खासदार तथा भाजप प्रदेशाध्यक्ष विनय तेंडुलकर, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष ऑर्लांडो मिनेझीस आदी उपस्थित होते. नक्वी म्हणाले, गेल्या चार वर्षांत गरीब आणि अल्पसंख्याक समुदायातील २ कोटी ६६ लाख विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ झाला आहे. केंद्राने ५ लाख ४३ हजार युवकांना रोजगार आणि कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण केल्या. यात 'शिका आणि कमवा',



पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी, सोबत खासदार विनय तेंडुलकर.

### 'एव्हीएम' सुरक्षितच

विरोधकांकडून मतदानयंत्रांबाबत विनाकारण गैरसमज पसरविला जात आहे. आतापर्यंत एव्हीएमच्या आधारे झालेल्या निवडणुकीत भाजपसह अन्य पक्षांची सरकारे सत्तेवर आली आहेत. पण पराभव झाल्यानंतर त्याचे खापर एव्हीएमवर फोडण्याची पद्धतच रूढ झाली आहे. देशात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्र होण्या देशाचे आणि लोकशाहीचे हित आहे. पण त्यासाठी राजकीय पक्षांचे एकमत होणे गरजेचे आहे, असेही नक्वी यांनी स्पष्ट केले.

### नक्वींचे विरोधकांना आव्हान

केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी म्हणाले, आगामी लोकसभा निवडणूक भाजपकडून केवळ विकासाच्या मुद्द्यावरच लढविली जाईल. इतर सर्व मुद्दे गौण असतील. विकास हीच देशाची गरज आहे. विरोधकांनी हिंमत असेल, तर विकासाच्या मुद्द्यावर लोकसभा निवडणुकीत भाजपशी दोन हात करावेत, असे आव्हानही त्यांनी दिले

केन्द्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी का दावा
**मोदी सरकार ने किया देश के अल्पसंख्यांकों का सर्वंकष विकास**

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| GOAN VAARTA | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

# मोदी सरकारकडून देशातील अल्पसंख्याकांचा सर्वंकष विकास

नवाज कौशल्य विकास योजना', 'नई मंजील' आदी योजनांचा समावेश आहे. तर 'नई रोशनी', 'बेगम हजरत म्हल' अशा शिष्यवृत्तींचा १ कोटी २१ लाख महिला आणि मुलींना लाभ झाला आहे. मुस्लिम मुलींचे शाळागळतीचे प्रमाण ७० टक्के होते, ते आता ४० टक्क्यांवर आले आहे. हे प्रमाण शून्य टक्के करण्याचे सरकारचे ध्येय आहे, असे त्यांनी नमूद केले.

'हुनर हट' या कार्यक्रमाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समुदायातील १ लाख १८ हजार पारंपरिक कलाकार आणि कारागिरांना रोजगार आणि रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. २०१९ पर्यंत पाच लाख कारागिरांना रोजगार पुरविण्याचा सरकारचा निश्चय आहे. स्वयंरोजगारासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या (एनएमडीएफसी) माध्यमातून ६ लाख ३० हजार लोकांना माफक व्याजदरावर कर्ज पुरवठा करण्यात आला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

## नक्वींनी घेतलेला योजनांचा आढावा

- स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत देशात ऑक्टोबर २०१४ पासून ७ कोटी २५ लाख शौचालयांची उभारणी करण्यात आली.
- मुद्रा योजनेअंतर्गत १३ कोटी लोकांना सहा कोटी रुपयांपेक्षाही जास्त कर्जवाटप करण्यात आले. त्यापैकी ६५ टक्के लाभार्थी महिला, अनुसूचित जाती - जमाती आणि अल्पसख्याक गटातील आहेत.
- १९ हजार खेड्यांमध्ये वीज पोहोचविण्यात आली आहे. एक कोटी घरांना सौभाग्य योजनेचा लाभ झाला आहे.
- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत एक कोटी घरांची बांधणी करण्यात आली आहे.
- गेल्या चार वर्षांत ६८ निवासी विद्यालये, ११ पदवी महाविद्यालये, ४६९ नवोन्मुख शिक्षण सहाय्य (वर्गखोली सुविधा), १६३ मुलींची वसतीगृह, ५३ आयटीआय, ८७४ शाळा इमारती, शेतकऱ्यांसाठी ४३६ मार्केट शेड, १६,२९७ अतिरिक्त वर्ग खोल्या, ३३० सद्भाव मंडप उभारण्यात आले आहेत.

### सर्वसामान्य केंद्रस्थानी

व्हीआयपी आणि लाल दिव्याची परंपरा मोडित काढून गरीब आणि गरजू लोकांना केंद्रस्थानी ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध योजना आखल्या. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर 'गिव्ह इट अप' योजनेअंतर्गत एक कोटी लोकांनी एलपीजी अनुदान सोडले. याचा लाभ 'उज्ज्वला' योजनेच्या माध्यमातून चार कोटी गरीब कुटुंबांना झाला, असे नक्वी म्हणाले, संसदेच्या कॅन्टीनचे अनुदान सरकारने बंद केले. हज यात्रेसाठीचे अनुदान बंद करून हा पैसा अल्पसंख्याकांच्या शिक्षण आणि रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रमांसाठी वापरण्यात येत असल्याचे ते म्हणाले. देशात पहिल्यांदाच विकास ही संकल्पना रुजली आहे. विकासाला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सरकारने प्रामाणिक प्रयत्न करून समाजातील गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले आहे. सर्जिकल स्ट्राईक, नोटाबंदी, वस्तू व सेवा कर (जीएसटी) यांसारखे धाडसी निर्णय सरकारने घेतले. त्यामुळे दलालांची साखळी संपुष्टात येऊन प्रामाणिक आणि पारदर्शी व्यवस्था निर्माण झाली आहे. शिष्यवृत्ती, अनुदानाचे हस्तांतरण डिजिटल माध्यमातून करून मधली साखळी संपुष्टात आणली आहे. पूर्वी केवळ २८ योजना थेट लाभार्थी हस्तांतरण कार्यक्रमाखाली (डीबीटी) होत्या. सध्या एकूण ४३१ योजना 'डीबीटी'अंतर्गत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पत्रकार परिषदेनंतर नक्वी यांनी राज्यातील रेडिओ चॅनल्सच्या रेडिओ जॉकींशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धीजीवी आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवाद साधून केंद्र सरकारची उपलब्धी आणि विविध योजनांची माहिती दिली.

Mon, 04 June 2018
www.readwhere.com/read/c/29228091

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| NAVPRABHA | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

**केंद्रीय मंत्री मुख्तार नक्वी : राम मंदिर, हिंदुत्वाचा मुद्दा नाही**

# विकासाच्या मुद्द्यावरच २०१९ ची निवडणूक लढवणार

पणजी (न. प्र.)

**राम मंदिर व हिंदुत्त्व नव्हे तर विकास हाच मुद्दा घेऊन भाजप २०१९ सालची निवडणूक लढवणार आहे, असे केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी काल येथे पत्रकार परिषदेत सांगितले. केंद्रातील मोदी सरकारने गेली चार वर्षे केलेल्या कामाची माहिती नक्वी यांनी यानी यावेळी दिली. गेल्या चार वर्षात सरकारने देशात विकासाबरोबरच जे काही बदल घडवून आणले त्याद्वारे देशात परिवर्तन झाल्याचे ते म्हणाले. विदेशात असलेला भारतीयांचा काळा पैसा परत आणण्यासाठी चौकशी पथकाची स्थापना करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.**

केंद्रात भाजप सरकार सत्तेवर येण्यापूर्वी देशभरात व्हीआयपी संस्कृती सर्वत्र रूजलेली होती. सत्तेवर येताच भाजप सरकारने सर्वप्रथम त्याला मूठमाती दिली. त्यानंतर भाजपने देशात गरीब व मध्यमवर्गीयांसाठी योजना राबवून आपले सरकार हे सर्वसामान्य लोकांचे सरकार हे दाखवून दिल्याचा दावा नक्वी यांनी केला.




पत्रकार परिषदेत माहिती देताना केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी. बाजूस विनय तेंडुलकर.

हज यात्रेसाठी जाण्यास मुस्लिमांना दिली जाणारी सब्सिडी सरकारने बंद केली. त्यासाठीचा १ हजार १७ कोटी रु. एवढा निधी आता सरकार मुस्लिम मुलींच्या शिक्षणावर खर्च करीत आहे.

**विकास विरोधकांविरुध्द लढाई**

सरकारने गेल्या ४ वर्षांत कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व जाती व धर्मांच्या लोकांचा विकास घडवून आणला व विकासाची फळे सर्वांनाच चाखता यावीत याकडे प्रकर्षाने लक्ष दिले. आमची यापुढील लढाई ही विकासाला विरोध करणाऱ्यांविरुध्द आहे, असे ते म्हणाले.

देश व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारने ४३१ योजना तयार करून त्या कार्यान्वित केल्या. त्यामुळे जनसामान्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाल्याचा दावाही नक्वी यांनी केला.

**देशात ४.६६ कोटी अल्पसंख्य मुलींना शिष्यवृत्त्या**

सरकारने देशातील ४ कोटी ६६ लाख अल्पसंख्यांक विद्यार्थीनींना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या दिल्या. त्यामुळे शिक्षण अर्ध्यावर सोडणाऱ्या ह्या मुलींची टक्केवारी ७२ वरून ४०-४२ टक्क्यांवर आल्याचे ते म्हणाले.

केंद्र सरकारने गोव्यात ५ लाख ४३ हजार अल्पसंख्यांकाना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. नरेंद्र मोदी हे एक सक्षम असे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील भाजप पुढील निवडणुकीला सामोरा जाणार असल्याचे नक्वी यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना स्पष्ट केले.

**अल्पसंख्यांक सुरक्षितच**

देशात अल्पसंख्यांक सुरक्षित नाहीत व ते असुरक्षिततेची भावना व्यक्त करीत असल्याचे नक्वी यांच्या नजरेस आणून दिले असता देशातील अल्पसंख्यांक असुरक्षित नाहीत. काही छोट्या-मोठ्या घटना सोडल्यास गेल्या ४ वर्षांच्या काळात एकही जातीय दंगल देशात झाली नसल्याचे ते म्हणाले. काही विरोधी पक्षानी चालवलेला तो खोटा प्रचार असल्याचे ते म्हणाले. विदेशात असलेला काळापैसा परत आणण्यासाठी विशेष चौकशी पथकाची स्थापना करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

**खाणी सुरू करण्यासाठी गोवा सरकार प्रयत्नशील**

गोव्यातील बंद पडलेला खाण उद्योग पुन्हा सुरू व्हावा यासाठी भाजपचे गोव्यातील सरकार सर्व ते प्रयत्न करीत आहे, असे पत्रकारांच्या प्रश्नाचे उत्तर देताना नक्वी यांनी सांगितले. यासंबंधीची लोकांची चिंता ही रास्तच आहे. भाजप सरकारलाही याबाबत चिंता असून खाण उद्योग लवकर सुरू व्हावा यासाठी केंद्राच्या मदतीने राज्य सरकार सर्व ते प्रयत्न करीत आहे असे ते म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयाने खाण प्रकरणी हस्तक्षेप केलेला असल्याने तातडीने काही गोष्टी करण्यास अडचणी येत आहेत हे जनतेने समजून घेण्याची गरज आहे, असेही नक्वी यांनी यावेळी स्पष्ट केले.

डिझेल व पेट्रोलच्या वाढत्या किंमती हा केंद्र सरकारसाठी निश्चितच चिंतेचा विषय आहे असे त्यांनी त्यासंबंधी विचारलेल्या प्रश्नावर सांगितले.

राममंदिर और हिंदुत्व का मुद्दा नही

**विकास के मुद्दे पर ही होगा २०१९ का चुनाव**

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| PUDHARI | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

पुढारी

# खाणबंदीवर लवकरच तोडगा

## केंद्रीयमंत्री मुख्तार अब्बास नक्वी : इंधनदराबाबत पंतप्रधान, पेट्रोलियममंत्री गंभीर

**पणजी : प्रतिनिधी**

राज्याच्या खाणबंदीच्या प्रश्नाबाबत भाजप गंभीर असून गोवा प्रदेश भाजपचे नेते केंद्र सरकारशी तसेच योग्य अधिकारिणींशी सतत संपर्कात आहेत. सर्वोच्च न्यायालयात हा प्रश्न प्रलंबित असल्याने योग्यवेळी त्यावर तोडगा निघेल, असा विश्वास भाजपचे केंद्रीय नेते तथा अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी व्यक्त केला. वाढत्या इंधनदराबाबत जनतेबरोबरच केंद्र सरकारही गंभीर असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यावर गांभीर्याने विचार करीत असून निश्चितच ते योग्य तोडगा काढतील, असेही त्यांनी सांगितले.

पान ७ वर ▶




**पणजी : पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी, शेजारी खासदार विनय तेंडुलकर, के. श्यामाप्रसाद आणि ओर्लांदो मिनेझीस.** (छाया : समीर नार्वेकर)

Goa Edition
4 Jun, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**खान बंदी पर जल्द ही समाधान**
ईंधन दरों को लेकर प्रधानमंत्री और पेट्रोलियम मंत्री गंभीर

**विरोधियों में प्रधानमंत्री पद के दर्जनों उम्मीदवार**

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| TARUN BHARAT | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

# निवडणुकीत विकास हाच मुद्दा

## केंद्रीय मंत्री मुख्तार नकवी यांची माहिती : चार वर्षात मोदी सरकारकडून चौफेर विकास

प्रतिनिधी
पणजी

जे राजकीय पक्ष आमच्या सोबत होते, त्या सर्वांना सोबत घेऊनच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत उतरणार आहे. आतापर्यंत ज्या राजकीय पक्षानी भाजपला सोडले तो त्यांचा निर्णय होता. भाजपने अद्याप कुणालाही सोडले नसून भाजपची दारे सर्वांना खुली आहेत. मोदी सरकारने गेल्या चार वर्षात चौफेर विकास केला आहे. यापुढेही निवडणुकीत केवळ विकास आणि विकास हा एकमेव अजेंडा असणार आहे, असे भाजपचे नेते तथा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री मुख्तार अब्बास नकवी यांनी सांगितले.




**पणजी : पत्रकार परिषदेत बोलताना मुख्तार अब्बास नकवी. बाजूला राज्यसभा खासदार विनय तेंडुलकर, के. श्यामा प्रसाद व ऑरलांदो मिनेझिस.**

केंद्रात सत्तेत असणाऱ्या भाजप आघाडी सरकारला नुकतीच चार वर्षे पूर्ण झाली असून त्यासंदर्भात केंद्र सरकारने गेल्या चार वर्षात केलेल्या विकास कामांची माहिती देण्यासाठी रविवारी पणजीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नकवी बोलत होते. यावेळी त्यांच्या सोबत राज्यसभा खासदार विनय तेंडुलकर, के. श्यामा प्रसाद व ऑरनॉल्ड मिनेझिस उपस्थित होते.

**कठीण परिस्थितीतून देश सावरला**

मोदी सरकार जेव्हा सत्तेवर आले, तेव्हा काँग्रेसने देशाची आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती बिकट करून टाकली होती. मोदींनी अशा कठीण परिस्थितीतून देश सावरला. मोदींनी जनतेला कोणताही त्रास न देता देशाची विस्कटलेली घडी बसविली. विविध प्रकारच्या अनुदान सोडून देण्याचे आवाहन जेव्हा पंतप्रधानांनी केले, तेव्हा जनतेने त्यांना मोठे सहकार्य केले. जनतेच्या विश्वासास मोदी सरकार पात्र ठरले म्हणून पुढे विविध राज्यांमध्येही भाजप व मित्रपक्ष विजयी झाले.

**कृपया पान ८ पहा ▶▶**

**नकवी म्हणाले...**

- मोदींनी कठीण परिस्थितीतून देश सावरला
- मोदींची देशातच नव्हे, विदेशातही प्रशंसा
- कोट्यवधी घरांत वीज, एलपीजी पोहोचविला
- अनुदान रद्द करुन मिळालेला पैसा गरीबांसाठी वापरला
- काँग्रेसला देशाचा विकासवाद पचवता येत नाही
- सर्जिकल स्ट्राईक, नोटाबंदी, जीएसटी ऐतिहासिक
- तब्बल ४३१ योजना डीबीटीमध्ये आणल्या
- जनधन, मुद्रा, सौभाग्य योजनांमुळे गरीबांचा लाभ

**चुनाव में विकास का ही मुद्दा**

# निवडणुकीत विकास हाच मुद्दा

▶ ▶ पान १ वरून

सर्व काही सुरळीत असताना विकास करणे वेगळे आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विकास करणे वेगळे, आणि मोदी सरकारने नेमके तेच केले. त्यामुळे देशातच नव्हे तर विदेशांतही आज त्यांची प्रशंसा होत आहे, असे नक्वी यांनी नमूद केले.

**कोट्यवधी घरांत वीज, एलपीजी पोहोचविला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हीआयपी व्यक्तींच्या गाडीची लालबत्ती काढून कोट्यवधी गरीब आणि गरजुंना वीज मिळवून दिली आहे. देशभरात सर्वांना मिळवून देणे पंतप्रधानांचा ध्यास आहे. श्रीमंत लोकांकडून एलपीजी गॅसची सबसिडी काढून गरीबांच्या घरात मोफत गॅस कनेक्शन देण्यात आले. मोदींच्या सांगण्यावरून १ कोटीहून अधिक लाकोनी 'गिव इट अप' अभियाना अंतर्गत आपली एलपीजी सबसिडी सोडली आहे. गेल्या चार वर्षात उज्ज्वला योजनेंतर्गत जवळपास ४ कोटी लोकांना मोफत एलपीजी जोडणी मिळाली, अशी माहिती नाक्वी यांनी दिली आहे.

**सबसिडी रद्द करुन मिळालेला पैसा गरीबांसाठी**

संसद भवनमध्ये असलेल्या कँटीनमधील सबसिडी रद्द करून सरकारी पैसा वाचविला आहे. हज सबसिडीही रद्द केली आहे. त्यातून जे पैसे सरकारला मिळाले आहेत, ते जनतेसाठी खर्च करण्यात येत आहेत. २०१९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत मोदीच पंतप्रधान होणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**काँग्रेसला विकासवाद पचवता येत नाही**

संप्रदायवाद, परिवारवाद, जातीवाद व क्षेत्रवादाचे राजकरण करणाऱ्या काँग्रेसला भाजपचा विकासवाद पचवता येत नाही. आज सर्व भारतीय नागरिक मोदींच्या देशाच्या विकासकामात त्यांना साथ देत आहेत. आज मोदी भारतवासीयांसाठी विकासनायक बनले आहेत. गेल्या चार वर्षात सन्मानासह सशक्तिकरण आणि भेदभावावाचून सशक्तीकरण करण्याचा केलेला संकल्प पूर्ण केला आहे. समाजात प्रत्येक गरजा पूर्ण करून समाजात आनंद आणला आहे, असे नक्वी यांनी सांगितले.

**मोदींचे महत्वाकांक्षी, ऐतिहासिक निर्णय**

सर्जिकल स्ट्राईकपासून नोटाबंदी, जीएसटी यासारखे आर्थिक परिवर्तन आणले. त्याचा देशाला आता लाभ होत असून आगामी अनेक वर्षे त्याची चांगली फळे देशवासियांना मिळणार आहेत. अशी महत्वाकांक्षी, ऐतिहासिक ठरणारी पावले केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदीच उचलू शकतात, कारण ते राजकारणावर नाही तर राष्ट्रकारणावर विश्वास ठेवणारे आहेत.

**खाणप्रश्नी लवकरच तोडगा**

गोव्यात खाणींच्या प्रश्नाने सध्या सर्वांचीच झोप उडविली आहे, त्याबाबत त्यांना विचारले असता नक्वी म्हणाले की खाण प्रश्नाबाबत भाजप गंभीरपणे विचार करीत आहेत. भाजपाचे स्थानिक नेते त्याचा सतत पाठपुरावा करीत आहेत. लवकरच त्याच्यावर सकारात्मक तोडगा काढला जाईल, असे नक्वी यांनी सांगितले.

**४३१ योजना डीबीटीमध्ये आणल्या**

२०१४ या वर्षात केवळ २८ योजना डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरमध्ये होत्या तर आज ४३१ योजना डीबीटी मध्ये आहेत. मोदी यांनी देशात विकास यात्रा केली असून त्याअंतर्गत महिलांचा सन्मान केला तसेच त्यांच्या सुरक्षिततेला महत्व देऊन जलदगतीने शौचालये बांधलीत. 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत आजपर्यंत ७ कोटी २५ लाखाहून अधिक शौचालये निर्माण केली आहेत.

**जनधन, मुद्रा, सौभाग्य योजनांमुळे गरीबांचा लाभ**

गेल्या चार वर्षात 'जनधन योजना' अंतर्गत ३१ कोटी ५० लाख गरीब लोकांची बँक खाती उघडली. मुद्रा योजनेंतर्गत १३ कोटीहून अधिक कर्ज उपलब्ध करण्यात आले. यात ६५ टक्क्याहून अधिक लाभार्थी महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती अल्पसंख्यकांचा समावेश आहे. १९ हजार गावांमध्ये वीज पुरविली असून आज देशभरात वीज आहे. सौभाग्य योजनेंतर्गत १ कोटीहून अधिक घरांमध्ये वीज पुरविली. पंतप्रधान आवास योजना अंतर्गत १ कोटी घरे निर्माण करण्यात आली.

जन विकास कार्यक्रम अंतर्गत ६८ निवासी विद्यालय, ११ पदवी कॉलेज, ४६९ आधुनिक क्लास रुम, १६३ गर्ल्स हॉस्टेल, ५३ आयटीआय, ८७४ स्कूल भवन, ४३६ किसान मार्केट शेड, १६२९७ अतिरिक्त क्लास रुम, ३३० बहुउद्देशीय समुदायिक भवन 'सद्भव मण्डप' निर्माण केले आहेत.

**मुस्लीम विद्यार्थीनी ड्रॉप आऊट रेट शुन्यावर आणणार**

गेल्या चार वर्षात कोट्यवधी गरीबांना शिष्यवृत्ती देण्यात आली. अल्पसंख्याक समाजात २ कोटी ६६ लाख विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला. नई रोशनी स्कॉलरशिप अंतर्गत १ कोटी २१ लाख मुले आणि महिलांचे सशक्तीकरण करण्यात आले. मुस्लीम विद्यार्थीनींचा स्कूल ड्रापआऊट रेट ७०–७२ टक्के होता, तो मोदी सरकारच्या प्रयत्नांमुळे ४० टक्के झाला. भविष्यात हा ड्रॉपरेट शुन्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही नक्वी यांनी सांगितले.

तरुण भारत Mon, 04 June 2018
www.readwhere.com/read/c/29

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**PANAJI-GOA**

| NAME | DATE | LANGUAGE | PLACE | PERIODICITY |
|---|---|---|---|---|
| DAINIK HERALD | 04-06-2018 | MARATHI | PANAJI | DAILY |

# गरज भासल्यास नवीन युती शक्य

**पणजी, दि.३ (प्रतिनिधी) :**

पोटनिवडणुकांमधील पराभवाचा भाजपावर परिणाम झाल्याचे मान्य करीत भविष्यात जर आवश्यकता भासल्यास २०१९च्या लोकसभा निवडणुकांसाठी नवीन युती केली जाईल, असे केंद्रीय अल्पसंख्यांकमंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

केंद्रीय मंत्री नक्वी यांनी गोव्यात 'ट्रान्सफॉर्मिंग इंडिया' मोहीम आणि भाजप सरकारने गेल्या चार वर्षात केलेल्या विकासकामांचा आढावा घेतला.

केंद्रीयमंत्री नक्वी यांना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले, भाजपाने मित्र पक्षांना कधी सोडले नाही त्यामुळे मित्रपक्ष सोबत असणे पक्षाला आवडेल. जर नवीन युतीची आवश्यकता असेल,



केंद्रीय अल्पसंख्यांकमंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांची माहिती

तर त्यावर विचार केला जाईल. युतीसाठी भाजपने 'नो एंट्री' सिग्नल दिला नाही. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळापासून भाजप घटकपक्षांशी बांधील आहे. त्यामुळे मोदींच्या नेतृत्वाखाली २०१९च्या निवडणुका लढणार, असेही नक्वी म्हणाले. लोक विकासाला प्रधान्य देऊन मत देतील आणि येणाऱ्या काळात केवळ विकासावर भर दिला जाणार आहे, असेही ते म्हणाले.

पोट निवडणुकांमध्ये झालेल्या भाजपच्या पराभवावर नक्वी म्हणाले

**दैनिक हेराल्ड**
**अँकर**

की, पोटनिवडणुकांमध्ये भाजपाचा झालेल्या पराभवामुळे काही फरक पडत नाही, असे म्हणणे चुकीचे ठरेल. जेव्हा आपण रणभूमीत असतो आणि आपल्या विरोधकाची रणनीती आणि डावपेच आपल्याला माहिती असतात तेव्हा लढणे सोपे होते. पोटनिवडणुकांमधून याची अनुभूती आली आहे आणि त्यामुळे आता जिंकणे सोपे झाले आहे.

देशभरात शेतकऱ्यांच्या चालेलेल्या आंदोनाविषयी त्यांनी खंत व्यक्त केली.

पान २ ▶

## इंधनप्रश्नी दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील

इंधन दरवाढीपासून जनतेला दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. जनतेबरोबरच सरकारला वाढल्या इंधन दरवाढीची चिंता सतावत आहे. पेट्रोल, डिझेल, एलपीजीचे दर वाढत आहेत. जेव्हा भाजप विरोधक होता तेव्हा भाजपने वाढत्या दरांविरोधात आवाज उठवला होता. कारण त्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर कमी होते. सध्या वाढत्या दराबाबत पेट्रोलियम मंत्री यांनी आपण यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले.

## 'तिहेरी तलाकचे धर्माशी देणेघेणे नाही'

तिहेरी तलाकचे धर्माशी देणेघेणे नाही. तिहेरी तलाक एक कुप्रथा आहे आणि ती बंद करण्याची गरज आहे. त्यामुळे लोकसभेत बील संमत करण्यात आले होते. मात्र, कॉंग्रेस आणि त्यांचे युती पक्ष ते राज्यसभेत टाळत आहेत. येणाऱ्या काळात हे बील राज्यसभेत संमत करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्याप्रमाणे सती, बालविवाह प्रथा बंद झालेल्या आहेत त्याचप्रमाणे ही प्रथा संपविली पाहिजे. दरम्यान, खाण प्रश्नी राज्य सरकार गंभीर आहे आणि त्यावर लवकरच काही तोडगा काढला जाईल असे त्यांनी सांगितले.

## गरज भासल्यास नवीन युती शक्य

गेल्या ४ वर्षात सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत आणि अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

**अल्पसंख्यांक सुरक्षित**

लोकशाही असलेल्या अन्य देशांच्या तुलनेत भारत असा देश आहे, ज्या ठिकाणी अल्पसंख्यांक सुरक्षित आहेत. अल्पसंख्यक आणि त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक हक्क भारतात सुरक्षीत आहेत. जे देशात भयावह स्थिती निर्माण करू पाहतात, त्यांना यश मिळणार नाही. काही शक्ती विशेषत: राजकीय शक्ती विकास, शांती आणि समृद्धी भंग करण्याचा प्रयत्न करतात. गेल्या काही दिवसांत देशात जे गुन्हे घडले, त्यावर वेळोवेळी कारवाई केली आहे. घटनांना जबाबदार असलेल्या व्यक्तिंना कोठडी दिली आहे.

**आवश्यकता पडने पर नयी युती हो सकती है**